# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
## प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर

दूरध्वनी क्र. (०२३१) २६५२९५२,
२६६०४४८
फॅक्स नं. (०२३१) २६५२९५२
rokolhapur@mpcb.gov.in

उद्योग भवन,
कलेक्टर ऑफीस जवळ,
कोल्हापूर-४१६००३

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

जा.क्र.मप्रनि/प्राकाको/प्रानि/ २२०५२३०००८ दि. २३/०५/२०२२

प्रति,
मे. इचलकरंजी पॉवरलूम मेगा क्लस्टर लि.
सिंगल स्टेक होल्डर कंपनी - कल्लाप्पाण्णा आवाडे को. ऑप.
श्री लक्ष्मी औद्योगिक वसाहत हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**विषय** - जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९७४ कलम ३३ अ व हवा (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १०८१ कलम ३१ अ आणि धोकादायक कचरा (एम, एच आणि टी) नियम, 2008 अन्वये प्रस्तावित निर्देश.

**संदर्भ** – १. मंडळाने वेळोवेळी जारी केलेले विविध निर्देश.
२. मा. आ. श्री राजेंद्र पाटील यड्रावकर यांची दूरध्वनीद्वारे प्राप्त तक्रार
३. श्री. संदीप बाळासो चव्हाण, श्री मनोज चौगुले तसेच श्री गणेश कांबळे, अध्यक्ष, भिमराज तरुण मंडळ, साजणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचा दि. ०९.०५.२०२२ रोजीचा तक्रार अर्ज व दि. २३.०५.२०२२ रोजी कार्यालयासमोरील धरणे अंदोलन.
४. म. प्र. नि. मंडळ अधिकाऱ्यांची भेट दि. २१.०५.२०२२
५. उप-प्रादेशिक अधिकारी कोल्हापूर यांनी दि. २३.०५.२०२२ रोजी सादर केलेला प्रस्ताव.

---

**ज्याअर्थी,** तुमच्या उद्योगाचे स्थान जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९७४ व हवा (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ तसेच त्या मध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये प्रदूषण प्रतिबंध क्षेत्रात येते.

**ज्याअर्थी,** मप्रनि मंडळाने आपल्या उद्योगास जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९७४ च्या कलम २६; हवा (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ च्या कलम २१ तसेच व घातक घनकचरा व इतर घनकचरा (व्यवस्थापन व ट्रांन्स बाऊन्डरी मुव्हमेंट) अधिनियम, २०१६ च्या नियम ५ नुसार आपणास मंडळाचे संमती पत्र घेणे बंधनकारक आहे व त्या संमती पत्रातील अटी व शर्तीची पुर्तता करणे ही आपणावर बंधनकारक आहे.

**ज्याअर्थी,** या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तिळवणी ओढा येथे दि. २१.०५.२०२२ रोजी भेट दिली असता खालील त्रुटी आढळून आल्या.

१. भेटी दरम्यान कारखान्याच्या बॉयलरच्या बाजूला असलेल्या संरक्षक भिंतीच्या भगदामधून फिकट तपकिरी रंगाचे सांडपाणी सांडपाणी तिळवणी नाल्यामध्ये मिसळताना आढळले.
२. सदर तिळवणी नाला पुढे पंचगंगा नदीमध्ये सोडत असल्याने पंचगंगा नदीच्या प्रदूषणास कारणीभूत ठरत आहे.

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त संदर्भांकित प्रस्तावाचा व बाबींचा विचार करता, आपण वरील पर्यावरण विषयक कायद्यातील तरतुदींचे व संमतीपत्रातील अर्जाचे उल्लंघन करीत असून आपल्या व्यवसायामुळे पर्यावरणास हानी पोहोचत असल्याचे निदर्शनास आले आहे.

१. आपणास आपला उद्योग बंद करण्याचे आदेश का देण्यात येऊ नयेत?
२. सदर बाबत आपल्या उद्योगाची वीज व पाणी जोडणी खंडीत करण्याबाबत संबंधीत यंत्रणेस आदेश का देण्यात येऊ नयेत?

आपला आक्षेप/ प्रतिसाद या कार्यालयास सदरील निर्देश प्राप्त झाल्यानंतर ०७ दिवसाच्या आत जमा करावा अन्यथा आपल्या उद्योगा विरूदध पर्यावरण कायदया अंतर्गत उचित कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

23/05/22

(ज. शं. सांळुखे)
प्रादेशिक अधिकारी, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव व पुढील आदेशासाठी सविनय सादर :-**

१. मा.सदस्य सचिव, म.प्र.नि., मंडळ, मुंबई.
२. प्रादेशिक अधिकारी, (मुख्यालय),म.प्र.नि. मंडळ, मुंबई

**प्रत :-उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर:-**

- सदर निर्देश पत्र संबधीत उद्योगास पोहच करुन व अहवाल सादर करावा.